## चांदवड येथील श्री. एस.एस.छल्लाणी, दिवाणी न्यायाधीश क.स्तर न्यायालय चांदवड.

नि.दि.दावा क्रं.१६०००४४/२०१३
जग्गनाथ वि. भागवत
नि क्र. १२६ खाली.

**वादी तर्फे साक्षीदार क्रं.२ चा शपथेवर सरतपास वकिल श्री. जी. व्ही. ठाकरे यांचेमार्फत शपथेवर सुरु.**

**माझे नाव** – दिपराज संजय लोखंडे,
**वय** – ३९ वर्षे, व्यवसाय. सह दुय्यम निबंधक चांदवड,
**पत्ता** – चांदवड, ता. चांदवड, जि. नाशिक.

**०१.** मला साक्ष समन्स मिळाल्यावरुन मी न्यायालयात साक्ष देण्याकरीता हजर आहे. दस्त क्रं. ५६३/१९७० हा आमच्या कार्यालयात दिनांक २१/०४/१९७० रोजी नोंदणीकृत करण्यात आला होता. सदर दस्त शर्त खरेदीखताचा आहे. सदरचा दस्त लिहूण देणार छबू गंगाराम कांदळे यांनी लिहूण घेणार गोपाळा म्हहाळू मांदळे यांच्यामध्ये झालेला आहे. सदर शर्त खरेदीखत दोन वर्षाकरीता होते. सदर शर्त खरेदीखत हे गट क्रं. ४६०, मुळ सव्हे क्रं. १४१, मौजे भाटगाव या जमीनीतील दक्षिण बाजूकडील तिन एकर क्षेत्र या मिळकतीबाबत होते. सदरचे क्षेत्र शर्तीवर खरेदी घेण्यात आले होते. आज मी सदर दस्ताची कार्यालयीन प्रतिची प्रमाणीत प्रत सोबत आणली आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्याला या वेळी **नि. क्रं. १२९** देण्यात आला.

**०२.** पूर्वी दस्त नोंदणी होवून ते पूणे येथे फोटो साठी जात होते. साक्षीदाराला आता नि. क्रं. ७५ वरील शर्त खरेदीदाचा दस्त दाखविला. सदर दस्त क्रं. ९३४/१९९१ हा आमच्या कार्यालयात दिनांक ०७/०५/१९९१ रोजी नोंद झाला आहे. सदर शर्त खरेदीखताची किंमत पाच हजार रुपये होती. सदरचा दस्त लिहूण देणार शेवंताबाई गोपाळा मांदळे यांनी लिहूण घेणार सखुबाई जग्गनाथ कांदळकर यांच्यामध्ये झालेला आहे. सदर शर्त खरेदीखत एक वर्षाकरीता होते. सदर शर्त खरेदीखत हे गट क्रं. ४५५, मौजे नारायणगाव या जमीनीतील दक्षिण बाजूकडील एक हेक्टर क्षेत्र या मिळकतीबाबत होते. सदरचे क्षेत्र शर्तीवर खरेदी घेण्यात आले होते. आज मी सदर दस्ताची कार्यालयीन प्रतिची प्रमाणीत प्रत सोबत आणली आहे. नि. क्रं. ७५ व मी आज सोबत आणलेले दस्तातील मजकूर सारखाच आहे व तो खरा व बरोबर आहे. त्यावर साक्षीदार म्हणून कमल निवृत्ती ठोके व जग्गनाथ छबू कांदळकर यांच्या सहया आहेत.

०३. साक्षीदाराला आता नि. क्रं. ९२ वरील मृत्यू पत्राचा दस्त दाखविला. सदर दस्त क्रं. ७२३/१९८७ हा आमच्या कार्यालयात दिनांक २५/०५/१९८७ रोजी नोंद झाला आहे. सदर मृत्यूपत्र गोपाळा म्हहाळू मांदळे यांनी लिहूण ठेवलेला आहे. सदर मृत्यूपत्र हे गट क्रं. ४८२, मौजे भाटगाव या जमीनीचे चार हेक्टर तिन आर व पोटखराब ०.६ आर क्षेत्र या मिळकतीबाबत होते. आज मी सदर दस्ताची कार्यालयीन प्रतिची प्रमाणीत प्रत सोबत आणली आहे. नि. क्रं. ९२ व मी आज सोबत आणलेले दस्तातील मजकूर सारखाच आहे व तो खरा व बरोबर आहे. त्यावर साक्षीदार म्हणून पुंजाराम बाळा भदाणे व दत्तु उखा गांगुर्डे यांच्या सहया आहेत.

०४. शर्त खरेदीखत आता शासणाने सावकारी कायद्यामुळे बंद केले आहे. त्यामुळे ते आता नोंदणीकृत होत नाही. शर्त खरेदीखत हे कायमचे खरेदीखत नाही. शर्त खरेदीखत हे गहाण खताच्या स्वरुपात असते. सण १९७२ पूर्वी सव्हे क्रमांक अस्तीत्वात असल्याने दस्तांमध्ये क्षेत्राचे परिणाम एक्कर व गुठयांमध्ये नमूद असायचे व आता दस्तात क्षेत्र हे हेक्टर व आर मध्ये नमूद असते.

**सरतपास संपला.**

**उलटतपास प्रतिवादीतर्फे श्री. डी. डब्लू. पिंगळे वकील यांच्या मार्फत गैरहजर व सहाय्यक वकिल सुषमा पवार हजर, प्रतिवादी हजर, श्री. पिंगळे वकिल दुपार सत्रात हजर राहणार असे सांगितले आहे, त्यामुळे उलटतपास दुपार सत्रापर्यंत तहकूब करण्यात आला.**

**श्रवणोत्तर स्वीकृती,**

**sd/-**

(एस. एस. छल्लाणी)

दिवाणी न्यायाधिश क. स्तर,

दि. १२/०८/२०२५. चांदवड.

नि.दि.दावा क्रं.१६०००४४/२०१३
जग्गनाथ वि. भागवत
नि क्र. १२६ खाली.

**प्रतिवादी क्रं. ४ ते ६ तर्फे श्री. आर. सी. जाधव वकील यांच्या मार्फत –**

**प्रतिवादी क्रं. ७ तर्फे श्री. डी. आर. गांगुर्डे वकील यांच्या मार्फत –**

**उलटतपास नाकारला.**

**शपथेवर उलटतपास प्रतिवादी क्रं. १ ते ३ तर्फे श्री. डी. डब्लू. पिंगळे वकील यांच्या मार्फत –**

**५.** मी १८ मार्च २०२४ पासून दुय्यम निबंधक म्हणून चांदवड येथे कार्यरत आहे. आता साक्षीदाराला नि. क्रं. ८१ वरील गटस्कीम उतारा दाखविण्यात आला. साक्षीदाराने जुना क्रं. १२८/३, १२९/३, १३५/२ब व १४१ यांचा मिळून गट क्रं. ४६० झालेला असल्याचे दिसून येते असे सांगितले. आता साक्षीदाराला नि. क्रं. ८२ व ८३ वरील उतारे दाखविले. सदर उता–यात क्षेत्र सण १९६८–६९ पर्यंत एक्कर व गुंठयात नमूद आहे.

**प्रश्न** – नि. क्रं. ८५ वरील गट क्रं. ४६० चा सातबारा उता–यात सण १९६९–७० मध्ये क्षेत्र हेक्टर व आर मध्ये रुपांतरण झाले आहे ?

**उत्तर** – सातबारा बाबतीत तलाठी यांचे मार्गदर्शन घेणे आवश्यक आहे, दस्तासोबत सातबारा उतारा जोडला नव्हता.

**६.** नि.क्रं. १२९ वरील दस्त क्रं. ५६३/१९७० हा गट क्रं. ४६० बाबतीत आमच्या कार्यालयात नोंदणीकृत करण्यात आला होता. नि.क्रं. ७५ वरील दस्त क्रं. ९३४/१९९१ हा नारायण गाव येथील गट क्रं. ४५५ बाबतचा आहे. हे म्हणणे खरे आहे की, नोंदणीकृत दस्तात झालेली चूक नोंदणीकृत दस्तांनेच दुरुस्त करावी लागते. मी सरतपासात ज्या नोंदणीकृत दस्ताबाबत कथन केले आहे ते दस्त माझ्यासमोर नोंदणीकृत झालेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, मला त्या दस्तांबाबत व्ययक्तीक माहिती नाही.

**उलटतपास संपला.**

**फेरतपास काही नाही.**

वा. दा. कबूल केले.

Digitally signed by SUMIT SURESHCHANDRA CHHALLANI
Date: 2025.09.02 17:44:27 +0530

**(एस. एस. छल्लाणी)**

**दिवाणी न्यायाधिश क. स्तर,**

**चांदवड .**

दिनांक ०२/०९/२०२५

श्रवणोत्तर स्वीकृती,

Digitally signed by SUMIT SURESHCHANDRA CHHALLANI
Date: 2025.09.02 17:44:40 +0530

**(एस. एस. छल्लाणी)**

**दिवाणी न्यायाधिश क. स्तर,**

चांदवड.